पुण्य नगरी

# डॉ. मगदूम फार्मसी कॉलेज येथे गांधी जयंती उत्साहात

## स्वच्छता अभियानाचे आयोजन

**जयसिंगपूर : प्रतिनिधी**

डॉ. जे. जे. मगदूम फार्मसी कॉलेज, जयसिंगपूर येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे औचित्य साधून महाविद्यालय परिसरात स्वच्छता अभियान राबवण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात आयक्यूएससीप्रमुख डॉ. प्रियांका गायकवाड यांच्या हस्ते महात्मा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. या वेळी प्राध्यापक, शिक्षकवर्ग तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. गांधीजींच्या जीवनातील साधेपणा, सत्याग्रहाची भूमिका आणि त्यांच्या स्वच्छतेवरील शिकवणी या संदर्भात मार्गदर्शन करण्यात आले.

यानंतर एनएसएस विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांनी स्वच्छता हीच सेवा या संकल्पनेतून महाविद्यालय परिसरात स्वच्छता मोहीम राबवली. विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी स्वतः सहभाग घेत झाडू हातात घेऊन परिसर स्वच्छ केला. प्लास्टिक व अन्य कचऱ्याचे संकलन करून त्याची विल्हेवाट लावण्यात आली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण झाली. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शीतलकुमार पाटील, संस्थेचे चेअरमन डॉ. विजय मगदूम आणि व्हाईस चेअरपर्सन ॲड. डॉ. सोनाली मगदूम यांचे मार्गदर्शन लाभले. या अभियानाचे नियोजन व आयोजन राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत प्रा. प्रनील तोरसकर यांनी केले. विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी उत्साहाने भाग घेतला.

Kolhapur Edition
Oct 06, 2025 Page No. 04
Powered by: erelego.com